जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २२१ दिनांक :- १८/०८/२०२१

# कांदळवनाचे संवर्धन होवून अतिक्रमण थांबविणेकरीता पोलीस आयुक्त कार्यालयातर्फे कार्यशाळेचे आयोजन-

कांदळवनाचे संवर्धन व त्याअनुषंगाने घडणारे अपराध याबाबत कायदेशिर बाबी व करावयाची आवश्यक कारवाईच्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून आवश्यक ती प्रभावी उपाययोजना करण्याचे उद्‌देशाने मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तलयातर्फे दिनांक १८/०८/२०२१ रोजी आयुक्तालयातील 'संवाद सभागृह' येथे एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेस पोलीस विभागातील अधिकारी व तपासी अधिकारी यांचेसह कांदळवन बाबत कायदयाची अंमलबजावणी विषयी निगडीत महसुल विभाग, स्थानिक महानगर पालिका, वन विभाग, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सरकारी अभियोक्ता तसेच कांदळवन संबंधी काम करणारे सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटनपर भाषणात सदर कार्यशाळेची गरज व भविष्यात काम करतांना सर्व शासकीय विभागाशी असणारा आवश्यक समन्वय याबाबत विवेचन केले. सदर कार्यक्रमासाठी प्रामुख्याने श्री आदर्श रेड्डी विभागीय वन अधिकारी, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी कांदळवन संवर्धन विषयी त्यांच्या विभागाची भुमिका स्पष्ट केली. त्याचप्रमाणे कांदळवन तज्ज्ञ श्रीमती शितल पाचपांडे, प्रकल्प उपसंचालक कांदळवन प्रतिष्ठान, यांनी कांदळवन ओळख याविषयी मार्गदर्शन केले. श्री. आंजनेयुलू यांनी कांदळवन मॅपींग कसे केले जाते याबाबत माहिती दिली. तसेच आयोजित कार्यशाळेत श्री. राजेंद्र धोंगडे सेवानिवृत्त वनअधिकारी व ॲड. धिरज मिरजकर यांनी ऑनलाईन उपस्थित राहून कायदेविषयक मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेस वेळी श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार, अप्पर पोलीस आयुक्त यांचेसह आयुक्तालयातील पोलीस उपआयुक्त, सहा. पोलीस आयुक्त पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांचेसह कांदळवनाचे बाबतीत दाखल गुन्हयाचे तपासी अधिकारी हजर होते.






-----oooo-----